अर्जित रजा रोखीकरणाबाबत.

सातारा जिल्हा परिषद सातारा,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्र.साजिप/ साप्रवि-आस्था 2(4)/601/2019
दिनांक 19/10/2019

## परिपत्रक

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा नियम ) 1981 मधील नियम 50(1) बी व नियम 54 मधील तरतूदीनुसार अर्जित रजा साठविण्याची तसेच सेवानिवृत्ती वेळी रोखीकरण करण्याची तरतूद आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक अरजा 2401/8/सेवा-9 दिनांक 15 जानेवारी 2001 अन्वये अर्जित रजा साठविण्याची तसेच सेवानिवृत्ती वेळी अर्जित रजेचे रोखीकरण करण्यासाठी 300 दिवसाची मर्यादा दिली आहे.

जिल्हा परिषद सेवकांची अर्जित रजा रोखीकरणाची प्रकरणे मंजूरीसाठी सादर करण्यात येत असतात. त्या प्रकरणांची पडताळणी करता कर्मचा-यांची रजा हिशोबामध्ये खाडाखोड ही Whitener (पांढरी शाई ) लावून रजा हिशोब दुरुस्ती करुन प्रस्ताव प्राप्त होत असल्याचे दिसून आले आहे.ही बाब योग्य नाही. वास्तविक रजा हिशोब दुरुस्ती करण्यात आलेल्या ठिकाणी संबंधित कार्यालय प्रमुख यांनी स्वाक्षरी करणे अपेक्षीत आहे. तथापि त्या प्रमाणे कार्यवाही न करता Whitener (पांढरी शाई ) लावून दुरुस्ती करण्यात येत असल्याने अशी प्रकरणे मंजूर करणे नियमानुसार योग्य नाही. या बाबीचा विचार करुन जिल्हा परिषद कर्मचारी हे सेवेत दाखल झालेल्या दिनांकापासून सेवापुस्तकातील अर्जित रजेच्या नोंदी व रजेचा हिशोब यांची पडताळणी करुन रजा हिशोब चुकला असल्यास पूर्वीच्या रजा हिशोबातील अंकावर रेष मारुन किंवा अंकास गोल आळा करुन दुरुस्ती अंक नमूद करुन त्यावर कार्यालय प्रमुख यांनी स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे. त्यानुसार योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

तसेच प्रस्ताव सादर करताना उपरोक्त बाबी व्यतिरिक्त खालील प्रमाणे प्रमाणपत्र संबंधित कर्मचारी यांचे सेवापुस्ताकामध्ये नमूद करुन त्याची प्रत रजा रोखीकरणाचे प्रस्तावा सोबत वेगळी जोडण्यात येईल याची दक्षता कार्यालय प्रमुखांनी घेण्यात यावी.

### प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री.--------------------------- हुद्दा ------------------ हे ----------------- या कार्यालयातून दिनांक ------------------- रोजी नियत / स्वेच्छा सेवानिवृत्त झाले आहेत. श्री.------------------- यांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद सातारा यांचेकडील आदेश क्र.--------------------------------- अन्वये सेवानिवृत्त वेतन मंजूर झाले आहे. त्याचा P. P. O नंबर -------------------- असा आहे.

तसेच श्री.-------------------------- हुद्दा ----------------------------- हे दिनांक ----------- रोजी सेवेत दाखल झालेपासून दिनांक ---------------- सेवानिवृत्तीअखेर सेवापुस्तकामधील अर्जित रजेच्या नोंदी व रजा हिशोब याची पडताळणी करुन रजेचा हिशोब बरोबर असल्याची खात्री करता सेवानिवृत्त दिनांक ----------- रोजी -------------- इतक्या दिवसाची अर्जित रजा शिल्लक आहे. त्या बाबत सेवापुस्तकामध्ये प्रमाणित करण्यात आल्या बाबतची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकामध्ये घेण्यात आली आहे.

कार्यालय प्रमुख स्वाक्षरी

ठिकाण :-

दिनांक:-

यापुढे अर्जित रजा रोखीकरणाचे प्रस्ताव परिपूर्ण सादर करुन त्या सोबत वरील प्रमाणपत्र जोडून सादर करण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये कोणतीही उणीव राहणार नाही व प्रकरण मंजूर करण्यास विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदरचे परिपत्रक जि. प. साताराकडील www.zpsataragov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतआहे.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद, सातारा
# 9422993333
ceozpstr@gmail.com

प्रति,

१) खाते प्रमुख, सातारा जिल्हा परिषद (सर्व)
२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
३) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व)
४) बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए बा वि से यो (सर्व)
५) उप अभियंता बांधकाम/ग्रामीण पाणी पुरवठा/लघुपाटबंधारे उपविभाग(सर्व)
६) तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती (सर्व)
७) वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व)
८) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा
९) मुख्याध्यापक, प्रतापसिंह हायस्कूल सातारा

Scanned by CamScanner